# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/२०१९/ 906
दिनांक : 30 JAN 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत....

संदर्भ : शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१८/ प्र.क्र.४२७/ तांशि-४, दिनांक ३.१.२०१९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शासनाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदी व त्यानुसार करावयाच्या कारवाईची माहिती देण्यात आली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

तसेच दिनांक ५ जून २०१८ च्या दोन अधिसूचनांद्वारे पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणा नियमांतील नियम क्रमांक १५(ग) मधील तरतूदीनुसार **कोणत्याही संस्थेस विद्यार्थ्याने त्यांच्याकडे जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी व इतर कागदपत्रे कोणत्याही कारणास्तव स्वत:कडे ठेवून घेता येणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत कागदपत्रांची विद्यार्थ्याने मागणी केल्यास संस्थेला ती विद्यार्थ्याला परत करावीच लागतील.** नियमातील या तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना आपल्या अखत्यारीतील सर्व व्यावसायिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना देण्यात याव्यात.

पुढे असेही कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे संस्था परत करीत नसल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्या विद्यार्थ्यास सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई यांचेकडे तक्रार दाखल करण्याचा सल्ला दयावा. तसेच वर नमूद अधिनियमातील व त्याखालील

शिक्षण / प्रोग्राम,
सं.क्र. ८८/१८
पृष्ठांकित करुन प्रसिद्ध करावे.



580 2/2/19

नियमातील तरतूदी संस्थेच्या निदर्शनास आणून विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्रे ३ दिवसांच्या आत त्यास परत करण्याचे संस्थेस सूचित करावे. त्याउपरही संस्थेने नियमातील तरतूदीचे पालन क़रीत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांना उपरोक्त अधिनियमातील कलम २० नुसार शास्ती करण्याचा प्रस्ताव संचालनालयास पाठवावा व तसे विद्यार्थ्यास सूचित करावे.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत - माहितीस्तव सादर :

१. मा.सचिव,महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई ४०००३२.
२. मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई , ८वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/२०१९/398
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 06 FEB 2019

१)प्राचार्य, सर्व शासकीय,अनुदानित,विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या संस्था अमरावती विभाग अमरावती यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

Scanned by CamScanner